**ठळक बातम्या**

- भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना १३४ व्या जयंतीनिमित्त देशभरातून अभिवादन

- गुजरातजवळ अरबी समुद्रातून अठराशे कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त

- फरार हिरे व्यापारी मेहुल चौकसीला बेल्जियममध्ये अटक

**आणि**

- आयपीएलमध्ये आज लखनऊ सुपर जायंट्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सामना

**<><><><><><>**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त देशभरात त्यांना अभिवादन केलं जातंय.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश, राज्यसभेतले सभागृह नेते जे. पी. नड्डा, राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संसद भवन संकुलातल्या आंबेडकर यांच्या पुतळ्याला आज अभिवादन केलं.

**<><><><><><>**

जीवनातल्या असंख्य अडचणींवर मात करून बाबासाहेबांनी स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आणि आपल्या कर्तृत्वामुळे जगभरात आदराचं स्थान प्राप्त केलं, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

डॉ. आंबेडकर यांच्या प्रेरणेमुळेच आज देश सामाजिक न्यायाचं स्वप्न साकार करू शकतोय. बाबासाहेबांची तत्वं, त्यांचे आदर्श, स्वावलंबी आणि विकसित भारताच्या निर्मितीला बळ आणि गती देतील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपल्या संदेशात म्हणाले.

कोट्यवधी दलित आणि इतर मागास समुदायांसाठी बाबासाहेब भारतातचं नव्हे तर जगभरात आशा, स्वाभिमान आणि सामाजिक न्यायाचं मूर्तिमंत प्रतीक म्हणून ओळखले जातात, अशा शब्दांत महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी बाबासाहेबांना आदरांजली वाहिली आहे.

बाबासाहेबांनी चुकीच्या रुढी परंपरांमधून देशाला बाहेर काढून सर्वांना समान अधिकार त्यांनी मिळवून दिला, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाजमाध्यमावर बाबासाहेबांना आदरांजली वाहिली आहे. तर महामानव, विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या अलौकिक कार्याचं, विचारांचं कृतज्ञतापूर्वक स्मरण करुन त्यांना भावपूर्ण अभिवादन, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><><>'**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंतीनिमित्त मुंबईच्या चैत्यभूमीवर राजकीय नेत्यांसह भीम अनुयायी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी पहाटेपासून गर्दी झाली आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि महायुतीच्या मंत्र्यांनी देखील चैत्यभूमीला भेट देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केलं.

जातीयवाद हा अभिशाप असून विकसित भारताचे उद्दिष्ट गाठण्यासाठी डॉ आंबेडकर यांना अभिप्रेत जातीविरहित समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे, असे प्रतिपादन राज्यपालांनी यावेळी केलं. छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमणापासून देशाला वाचविले तर भारतरत्न डॉ आंबेडकर यांनी समतेसाठी आपले जीवन वेचले असे राज्यपालांनी यावेळी सांगितले. भारताच्या संविधानाच्या माध्यमातून देशाची एकता आणि अखंडता कायम ठेवण्याचे अमूल्य कार्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. आज आपण जो एकसंघ भारताचा अनुभव घेत आहोत, त्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान हेच आधारस्तंभ आहे, असं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं

**होल्ड-मुख्यमंत्री बाइट**

आंबेडकर जयंतीनिमित्त मुंबईत आज ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

<><><><><><>

रत्नागिरी जिल्ह्यात मंडणगड तालुक्यातलं आंबडवे या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूळ गावीही आज त्यांची जयंती साजरी करण्यात आली. जगभरातून अभ्यासक आणि पर्यटक येतील असं भव्य-दिव्य स्मारक आंबडवे गावी उभारलं जाईल. हे स्मारक बाबासाहेबांच्या विचारांचं म्हणजेच ज्ञानस्मारक असेल, अशी घोषणा राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी यावेळी केली.

नागपूरमध्ये बुद्ध विहारांमध्ये वंदना आणि अभिवादनाचे कार्यक्रम होत आहेत. दीक्षाभूमी तसंच संविधान चौकातही अभिवादनासाठी भीम अनुयायांच्या रांगा लागल्या आहेत. नागपुरातल्या अनेक भागात मोटार सायकल रॅली काढण्यात आली असून त्यात शेकडो अनुयायी सहभागी झाले आहेत.

<><><><><><>

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त राज्यभर विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून----

**VC**

*मुंबईत आज शहर आणि उपनगरात ठिकठिकाणी जयंती उत्सव साजरा केला जात आहे. मिरवणुका, फटाक्यांची आतिषबाजी, विद्युत रोषणाई आणि विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. मुंबईत वडाळा पूर्व येथील कोरबे मिठागर भागात डॉ. बाबासाहेब*

*आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं. तसंच या कार्यक्रमात रुग्णवाहिकेचं लोकार्पणही करण्यात आलं.*

***नाशिक*** *शहरात आज चौकाचौकात बाबासाहेबांच्या जीवन प्रसंगावर देखावे सादर करण्यात येत असून अभिवादनाचे कार्यक्रम सुरू आहेत.* ***कोल्हापुरात*** *बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त बिंदू चौकामध्ये महाआरोग्य शिबीराचं आयोजन करण्यात आलं होतं.*

***धाराशिव*** *जिल्ह्यात तुळजापूर शहरामध्ये बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आलं.* ***नांदेडमध्ये*** *जयंतीनिमित्त बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आलं. यावेळी हजारो अनुयायांनी गर्दी केली होती.* ***बीड*** *शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी सकाळी अभिवादन रॅली काढण्यात आली.* ***गोंदिया*** *जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेल्या खासदार प्रफुल्ल पटेल यांनी गोंदिया शहरात बाबासाहेबांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून आदरांजली वाहिली. तर* ***यवतमाळ****मध्ये राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉक्टर अशोक उईके यांनी बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन केलं.* ***अकोला*** *शहरात डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने शहरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.*

**<><><><><>**

अरबी समुद्राजवळ भारतीय सागरी सीमेजवळ गुजरात दहशतवाद विरोधी पथक आणि भारतीय तटरक्षक दलाने काल पहाटे केलेल्या कारवाईत १ हजार ८०० कोटी रुपये किमतीचे ३०० किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले. मुद्देमाल गुजरात एटीएसकडे सोपवण्यात आला असून एटीएस या प्रकरणाची सखोल चौकशी करत आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यानी या कारवाईबाबत भारतीय तटरक्षक दल आणि गुजरात पोलिसांचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

सीबीआयच्या विनंतीवरुन फरार हिरे व्यापारी मेहुल चौकसी याला बेल्जियम पोलिसांनी शनिवारी अटक केली आहे. पंजाब नॅशनल बँकेतल्या साडे १३ हजार कोटी रुपयांच्या कर्ज फसवणूक प्रकरणी त्याच्याविरोधात मुंबईतल्या न्यायालयानं अटक वॉरंट जारी केलं होतं. याप्रकरणातला दुसरा आरोपी नीरव मोदीचं लंडनमधून प्रत्यार्पण व्हायचं आहे. घोटाळा उघड होण्याच्या काही दिवस आधी, जानेवारी २०१८ मध्ये तो देशाबाहेर पळून गेला होता.

**<><><><><>**

मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी सात कोटी ८५ लाख रुपये किमतीचे ७८५ ग्रॅम अंमली पदार्थ जप्त केले आहेत. याप्रकरणी एका परदेशी  नागरिकाला अटक करण्यात आली आहे.

**<><><><><>**

अभिनेता सलमान खान याला जीवे मारण्याची आणखी एक धमकी देण्यात आली आहे. सलमान खानची गाडी बॉम्बनं उडवून देऊ किंवा त्याला घरात घुसून मारू असं धमकीच्या संदेशात म्हटलं आहे. हा संदेश मुंबईतल्या वरळी इथल्या वाहतूक विभागाच्या मोबाईलवर पाठवण्यात आला असून पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. वारंवार मिळणाऱ्या धमक्यांचा पार्श्वभूमीवर पोलिसांनी सलमान खानची सुरक्षा व्यवस्था कडेकोट केली आहे.

**<><><><><><>**

आयपीएल टी २० क्रिकेटमध्ये, आज लखनऊ सुपर जायंट्स चा सामना चेन्नई सुपर किंग्ज बरोबर होणार आहे. लखनऊच्या एकाना क्रिकेट स्टेडियमवर आज संध्याकाळी ७:३० वाजता हा सामना सुरू होईल. मुंबई इंडियन्सने काल दिल्ली कॅपिटल्सचा १२ धावांनी पराभव केला तर रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूने ९ गडी राखून राजस्थान रॉयल्सवर दणदणीत विजय मिळवला.

**<><><><><><>**

राज्यात अनेक ठिकाणी पुढील दोन ते तीन दिवस अवकाळी पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

कोकणात रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात आज काही ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. सिंधुदुर्ग तसंच **पश्चिम महाराष्ट्रात** कोल्हापूर, सातारा,सांगली, सोलापूर जिल्ह्यांना आज आणि उद्या पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे.

**मराठवाड्यात** नांदेड, लातूर, धाराशिव इथंही पुढील दोन दिवस पावसाचा अंदाज असून या जिल्ह्यांना ही यलो अलर्ट जारी केला आहे.

**विदर्भातही** भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा इथंही पुढील पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><><>//**